PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Preliminary Examination (2024-25)

## Standard - XII

**Subject - MARATHI** | **Marks - 100**
**Date - 10/01/2025** | **Time : 8:15 am to 11:15 am**

**विभाग १ - गद्य (गुण - २०)**

**कृती १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (८)**

आनंद सगळ्यांनाच हवा असतो... पण आपला आनंद नेमका कशात आहे, हे अनेकांना कळत नसतं. आनंद म्हणजे नेमकं काय हेही उलगडलेलं नसतं. कुठे असतो हा आनंद? कुठे असतो हा आनंद? आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे! ही फक्त कविकल्पनाच नव्हे, तर सत्य आहे, किंबहुना शाश्वत सत्य आहे!

आनंदाची गंमत अशी आहे, की तुम्ही शोधू लागलात, की तो दडून बसतो, पकडू गेलात, की हातातून निसटतो. आनंदासाठी जितका आटापिटा कराल, तितका तो हुलकावण्या देतो. जितका सहजपणे घ्याल, तितका आनंद सहज प्राप्त होतो. आनंद असतोच. तो अनुभवता मात्र यावा लागतो.

आनंदाच्या बाबतीत कळसा काखेत असूनही आपण गावाला वळसा घालीत असतो. आनंद आपण बाहेर शोधत असतो आणि तो मात्र आत असतो. आनंद आपल्या मनातच असतो. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो.

हे खरं आहे, की आनंद सर्वत्र असतो; पण अंतरंगात आनंद असेल, तरच तो अनुभवता येतो. आनंदाचं नातं जुळतं, ते फक्त आनंदाशी. आनंदाला आकर्षित करतो, तो फक्त आनंदच. आनंदाला प्रसवतो, तोही आनंदच.

आनंदाचं भान जागृत ठेवणं हेच आनंदाचं रहस्य आहे. असंख्य, अगणित पातळ्यांवर आनंद अनुभवता येतो. आपल्या आयुष्यासोबत ज्याचं अस्तित्व असतं, तो म्हणजे अस्तित्वाचा आनंद. आपलं अस्तित्व आपण नेहमीच गृहीत धरून चालतो आणि अस्तित्वाच्या आनंदाला मुकतो. आपल्या अस्तित्वाची साक्ष देत असतो, तो आपला श्वास.

आपल्या श्वासाचंही आपल्याला भान नसतं. खरंतर श्वास हा शरीर आणि मन यांना जोडणारा सेतू असतो. हा सेतू आपण जाणीवपूर्वक वापरत नाही. पोटातून खोलवर श्वास घेणं केवळ आरोग्यासाठी चांगलं असतं, असं नव्हे, तर त्यामुळे मनही शांत होतं. मुख्य म्हणजे श्वासाचं बोट धरून मनापर्यंत पोहोचता येतं, मनाशी नातं जोडता येतं.

पण आपण श्वासाकडे लक्षच देत नाही. आयुष्यातला एकेक क्षण येतो आणि जातो. आपण क्षणांकडे लक्ष देत नाही. एकेक दिवस उजाडतो, मावळतो. आपण दिवसाकडे लक्ष देत नाही. सूर्योदय, सूर्यास्त होतो, तोही आपण नीट पाहत नाही. तो दिसतो, तेव्हा आपल्याला दृष्टी आहे, हेही आपण गृहीत धरतो. जे जे आनंद देणारं आहे, ते गृहीतच धरून चालल्यामुळे आपल्याला ना सृष्टीचं कौतुक वाटतं, ना दृष्टीचं. आपल्या श्वासाचं, आपल्या अस्त्विाचं, आपल्या अस्तित्वाच्या आनंदाचं भान हवं.

आपलं अस्तित्व हीच एक कमाल आहे. एक अद्‌भुत सत्य आहे. भले सापेक्ष असेल, पण सत्य आहेच.

१) आनंदाची गंमत अशी आहे........................................................ मात्र यावा लागतो.
वाक्य पूर्ण करा... **(२)**

२) लेखकाच्या मते आनंद कुठे असतो ते लिहा... **(२)**

३) तुम्हाला झालेल्या आनंदाचे वणर्न ६ ते ८ ओळीत करा. **(४)**

**कृती १ (आ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

मध्यरात्र केव्हाच उलटून गेलेली असते. उत्तररात्रीनं हलकेच आकाशात पाऊल ठेवलेलं असतं. इतकं हळूवारपणे, इतकं अलगद, इतकं मुलायम, की कुणाला चाहूलदेखील लागू नये; पण ही चाहूल मला मात्र सहज लागते. तिच्या पावलांची मंद मंद नाजूक स्पंदनं माझ्या मनात मात्र कुठं तरी उमटत राहतात. जणू त्यामुळेच मग माझा डोळा लागत नाही. पुरेशी झोप झाली आहे, असं वाटत राहतं.

मी हलकेच उठतो. चूळ भरतो. डायनिंग टेबलजवळ येतो. त्याच्याजवळची खिडकी हलकेच उघडतो. रात्रीच्या निरव शांततेची निद्रा भंग होऊ नये म्हणून. बाहेर पाहतो तो आसमंतात काळाकुळकुळीत अंधार दाटलेला. बागेतल्या साऱ्या झाडांचा, साऱ्या वेलींचादेखील डोळा लागलेला. त्यांच्यावरची पाखरंदेखील गाढ झोपलेली. त्यांचा चिवचिवाट अजून सुरू झालेला नसतो, कारण आता फक्त पहाटेचे तीन–साडेतीन तर वाजलेले असतात. का कुणास ठाऊक, ही वेळ मला फार आवडते. सारं जग साखरझोपेत असतं. साऱ्या चिंता–काळज्या मिटल्या–विरलेल्या असतात. मन कसं समेवर आलेलं असतं. मला वाटतं, आपलं खरंखुरं मन हेच असतं. जे सुखदु:खांच्या पलीकडे कुठंतरी दूर दूर गेलेलं असतं. आपलंच नव्हे तर या दुधाळ सायलीचंदेखील. तांबडसर बोगनवेलीचंदेखील. केशरी गुलमोहोराचंदेखील. जांभुळसर जॅक्रांडाचंदेखील. किरमिजी–निळसर–पिवळसर इवलाल्या इंद्रधनुष्यी फुलांच्या घाणेरीचंदेखील. पांढऱ्याशुभ्र नि रक्तचंदनी चाफ्याचंदेखील.

**१) कारणे शोधा व लिहा** **(४)**

य) पाखरांचा चिवचिवाट सुरू झालेला नसतो.

कारण – **(१)**

र) पहाटेची वेळ मला फार आवडते.

कारण – **(१)**

२) उताऱ्यात आलेल्या फुलझाडांची नावे लिहा **(२)**

३) 'पहाटेचे आणि पाखरांचे असलेले जवळकीचे नाते', तुमच्या शब्दांत लिहा.

**कृती १ इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(४)**

१) कोकणातील बाबल्याच्या नंदनवनाबाबत असलेल्या कल्पना **(२)**

य.

र.

२) मुंबईकर कामगाराला सायंकाळी गावाकडल्या येणाऱ्या आठवणी लिहा. **(२)**

कोकणी खेड्यात झाडामाडांच्या सावलीत राहणाऱ्या तरूणाला विचारून पहा, की 'बाबल्या तुझं नंदनवन रे कोणतं?' तो सांगेल. 'मुंबईतल्या कारखान्यात नोकरी नि डोकं टेकायला चाळीत हक्काची कोठरी, हेच माझं नंदवनन', मग भले पाण्याच्या नावाने ठणठणाट असो वा इतर सुविधांच्या नावाने आनंद, पण मुंबईत स्वत:ची खोली पाहिजे. तोच त्या कोकण्याचा स्वर्ग. तेच मुंबईतल्या चाळीत खितपत पडलेल्या कामगाराला विचारून पहा. तो तत्काळ सांगेल, 'जो काही मोक्ष आहे तो गावाकडे वस्ती करण्यात आहे!' वास्तविक कोकणी पट्ट्यात खायचे वांधे असतात. घरात भाऊबंदकी असते. पैशांच्या नावाने शुद्ध खडखडाट असतो. गावात मुलाबाळांना शिक्षणाच्या सुविधा नसतात नि गुरांपैकी निम्मी भाकड असतात. सावकरांचे तगाद कायम असतात ते वेगळंच. तरीसुद्धा मुंबईकर कामगारांचं अवघं लक्ष त्यांच्या कोकणातल्या खेड्यात असतं. इकडे शहरवस्तीत सांजवलं की त्याला गावाकडच्या शांत दिवेलागणीची आठवण येते. गावातल्या मारुतीच्या देवळातला घंटानाद त्याला ऐकू येतो. तिकडे चुलीवर शिजत असलेल्या पिठल्याचा वास त्याला इकडे चिंचपोकळीत छळू लागतो.

## विभाग २ - पद्य (गुण - १८)

**कृती २ (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(१०)**

विंचू चावला वृश्चिक चावला ।
कामक्रोध विंचू चावला ।
तम घाम अंगासी आला ।।धृ.।।
पंचप्राण व्याकुळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ।।१।।
मनुष्य इंगळी अति दारुण ।
मज नांगा मारिला तिनें ।
सर्वांगी वेदना जाण ।
त्या इंगळीची ।।२।।
ह्या विंचवाला उतारा ।
तमोगुण मागें सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा ।
विंचू इंगळी उतरे झरझरां ।।३।।
सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण ।
किंचित् राहिली फुणफुण ।
शांत केली जनार्दनें ।।४।।

१) भारूडातील विंचू हे या विकारांचे प्रतिक आहे – **(२)**
य –
र –

२) विंचू इंगळी उतरवण्याचे उपाय – **(२)**
य –
र –

३) ‘दुर्जनांची संगत इंगळीच्या दंशाइतकी दाहक आहे’, स्पष्ट करा. **(४)**

४) ‘विंचू चावला’ या भारूडाची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा. **(२)**

**(आ) खालील ओळींचा अर्थ लिहा.** **(४)**

कणस भरूं दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृण पर्णां

**(इ) खालील ओळींचे भावसौंदर्य स्पष्ट करा.** **(४)**

‘रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले’.

## विभाग ३ - साहित्यप्रकार (कथा) (गुण - १५)

कथेचे 'सादरीकरण' ही एक कला आहे आणि योग्य प्रयत्नाने ही कला साध्य होऊ शकते. विविध प्रकारच्या कथांचे मूकवाचन, प्रकट वाचन करण्याचा सराव, विविध कथा लेखकांची/लेखिकांची लेखनशैली समजून घ्यायचा केलेला प्रयत्न, भाषेची जाण, शब्दोच्चार आणि सादरीकरण कौशल्ये यांमुळे कथाकथनांचे तंत्र अवगत होऊ शकते.

अलीकडच्या काळात 'कथाकथन' क्षेत्रात अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध होत आहेत. कथा-अभिवाचनाचे कार्यक्रम विविध निमित्ताने रंगमंचावरून सादर केले जात आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन या लोकप्रिय माध्यमांतून सादर केले जाणारे 'कथाकथन' अधिकाधिक लोकांना आकर्षित करत आहे. या पार्श्वभूमीवर कथा-सादरीकरण हा पैलू लक्षणीय ठरतो.

**अभिवाचन :** अभिवाचनामुळे कथा श्रोत्यांपर्यंत योग्यप्रकारे पोहोचण्यास मदत होते. कथेचे अभिवाचन एकाच वेळी जर अनेकांकडून केले गेले तर आवाजाचा एकसुरीपणा टळतो. संवादातील चढउतार, चटपटीतपणा, शब्दफेक यांतील विविधतेचा आनंद श्रोत्यांना मिळतो. कथेतील घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा यांचे आकलन होण्यास मदत होते. कथावाचनाला जर पार्श्वसंगीताची, प्रकाशयोजनेची, नेपथ्याची जोड दिली तर ते अभिवाचन श्रोत्यांवर चांगला परिणाम करते व दीर्घकाळ स्मरणात राहते.

**कथाकथन :** कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला भाषेच्या ज्ञानाबरोबरच वाचिक अभिनयाचीही थोडी जोड द्यावी लागते, त्यामुळे कथाकथन उठावदार होते. कथाकथन करणाऱ्याला शब्दांच्या माध्यमांतून पात्रांना जिवंत करायचे असते. कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला कथा सादर करायची असल्याने कोणताही लिखित मजकूर हातात नसतो. श्रोत्यांशी संवाद साधत, त्यांचा प्रतिसाद घेत, लेखकाच्या मूळ संहितेला धक्का न लावता; पण परिणामकारकरीत्या ती श्रोत्यापर्यंत पोहोचवायची असते.

कथेची निवड करणे फार महत्त्वाचे व तितकेच जबाबदारीचे काम असते. कथा सादरीकरणाचा कालावधी व श्रोत्यांचा अवधान काळ यांचे भान कथा सादरीकरणात ठेवावे लागते. कथा ही संवादातून खुलत असल्याने शब्दफेक, प्रभावी उच्चारण, स्पष्टता आणि शब्दांचा गर्भितार्थ श्रोत्यांपर्यंत थेट पोहोचवणे हे एकाचवेळी कौशल्यपूर्ण पण आव्हानात्मक काम असते.

कथेच्या सादरीकरणाला तंत्रज्ञानाची जोड देऊन सामाजिक संपर्काच्या माध्यमांतून आज कथा वाचकांसमोर येते.

**कृती ३ सूचनेनुसार कृती करा.** **(६)**

**(अ.) एका वाक्यात उत्तर लिहा.**

**१)** कथाकथन या लोकप्रिय माध्यमांतून सादर केले जाते. **(२)**

य)

र)

**२)** कथाकथनाचे तंत्र अवगत होण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी लिहा. **(२)**

**३)** कथेच्या अभिवाचनाचा श्रोत्यांवर चांगला परिणाम होण्यास पूरक असलेल्या गोष्टी लिहा. **(२)**

**(आ) खालीलपैकी कोणत्याही तीन कृती सोडवा** **(९)**

१) 'शोध' कथेतील अनुचे स्वभावचित्र तुमच्या शब्दात रेखाटा.

२) 'बापू गुरुजींचे गावासाठीचे योगदान' याबद्दल तुमचे मत लिहा.

३) भिडे दाम्पत्याची सामाजिक बांधिलकी स्पष्ट करा.

४) उचापतीखोर लोकांनी बापू गुरूजींना दिलेला त्रास तुमच्या शब्दात विशद करा.

५) 'गढी' या शिर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

## विभाग ४ - उपयोजित मराठी (गुण - १९)

**कृती ४ (अ) कोणत्याही तीन कृती सोडवा** **(६)**

१) मुलाखतीचे स्वरूप स्पष्ट करा.

२) माहितीपत्रकाचे वेगळेपण स्पष्ट करा.

३) अहवालाची प्रमुख अंगे लिहा.

४) व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेखाची वैशिष्ट्ये लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा** **(१०)**

**१)** खालील मुद्द्यांच्या आधारे नोकरीसाठी व प्रवेशासाठी आलेल्या उमेदवाराला 'आतून' जाणून घेणे गरजेचे असते स्पष्ट करा.

बौद्धिक क्षमता---------ज्ञानाची पातळी--------------जीवनविषयक दृष्टिकोन-----------निर्णयक्षमता-------------भाषवरील प्रभुत्व---------गटनेतृत्व--------यशाचे श्रेय.

**२)** अहवाल लेखनाची आवश्यकता मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.

महत्त्वाचा दस्तऐवज--------अधिकृतता--------वस्तुनिष्ठ लेखन--------भविष्यातील योजनांसाठी मदत--------घडामोडींचा एकत्र आढावा.

**३)** खालील मुद्द्यांच्या आधारे 'माहितीपत्रकाची गरज' स्पष्ट करा.

माहितीपत्रक म्हणजे--------विविध क्षेत्रांची नावे--------लोकमत आकर्षित वेगवेगळी वैशिष्ट्ये व वेगळेपण----- ग्राहकाचा फायदा.

**(इ)** खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा **(३)**

१) वृत्तालेखांचे प्रकार स्पष्ट करा.

२) मुलाखतीचे हेतू स्पष्ट करा.

## विभाग ५ - व्याकरण व लेखन (गुण २८)

**अ. सूचनेनुसार कृती करा.**

**१)** य – किती आतून हसतात ती! (विधानार्थी वाक्य ओळखून लिहा) **(१)**

१) ती आतून हसतात.

२) ती खूप आतून हसतात.

र – सूचनेप्रमाणे सोडवा.

पुढचे सगळे मार्ग बंदच होते. (नकारार्थी वाक्य करा.) **(१)**

**२)** योग्य पर्याय निवडा **(१)**

य – 'पावलोपावली' या सामासिक शब्दाचा समास लिहा.

१) द्विगु समास

२) अव्ययीभाव समास

३) द्वंद्व समास

र – 'चोरभय' या सामासिक शब्दाचा समास लिहा. **(१)**

**३)** योग्य पर्याय निवडा.

य – श्रीधरपंतांनी बैलांना बांधले (प्रयोग ओळखून लिहा.) **(१)**

१) कर्तरी प्रयोग

२) कर्मणी प्रयोग

३) भावे प्रयोग

र– योग्य पर्याय निवडा **(१)**

कर्मणी प्रयोगाचे वाक्य ओळखून लिहा.

१) केशवने सदरा खरेदी केला.

२) स्वाती चित्रं रंगवते.

३) यांपैकी नाही.

**४)** योग्य पर्याय निवडा: **(१)**

य – दमडीचं तेल आणलं, सासूबाईंच न्हाणं झालं
मामंजींची दाढी झाली, भावोजीचं शेंडी झाली
उरलं तेल झाकून ठेवलं, लांडोरीचा पाय लागला
वेशीपर्यंत ओघळ गेला, त्यात उंट पोहून गेला.

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा. **(१)**

१) अनन्वय

२) अपन्हुती

३) अतिशयोक्ती

र– उपमान ओळखा **(१)**

कर्णासारखा दानशूर कर्णच.

**५)** य – ‘आभाळाकडे डोळे लावणे’ या वाक्प्रचाराचा अर्थ लिहा. **(१)**

र – ‘आभाळाकडे डोळे लावणे’ या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. **(१)**

**६)** शुद्ध शब्द ओळखून लिहा. **(२)**

य – १) उत्सव २) उस्सव ३) उतसव

१) परिक्षा २) परीक्षा ३) परीक्क्षा

र – वाक्य शुद्ध करून लिहा. **(२)**

१) सरवात आधि जाग येतं ती आमच्या बागेतल्या पाकरांना.

२) जणू त्या अल्ल्हादाला, हरशोउलहासाला एक अनावर भरति येते.

**७)** पुढील शब्दांचे अर्थ लिहा **(२)**

१) दिशाविहीन –

२) विकृती –

३) तात्पर्य –

४) ओढ

**८)** पुढील पारिभाषिक शब्दांना मराठी अर्थ लिहा **(२)**

१) Abstract

२) Boycott

३) Custom Duty

४) Etiquette

**कृती ५ (आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा.** **(६)**

१) मी अनुभवलेला पाऊस

२) माझा आवडता खेळ

३) परिचारिकेचे (नर्सचे) मनोगत

४) वृत्तपत्राचे महत्त्व

५) सूर्य मावळला नाही तर...

■■■